# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा

**डॉ. हेमंतकुमार विठ्ठलराव बागडे**
कार्य. प्राचार्य व मराठी विभागप्रमुख,
इंदिरा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय,
कळमेश्वर जि. नागपूर
मो. ८७९३२२१४७६

.......................................................................................................................

**प्रास्ताविक**

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन आंबेडकरवादी साहित्य समृद्ध झाले. आज आंबेडकरवादी कवितेच्या निर्मितीला जवळपास पाच दशके झाली. आंबेडकरवादी साहित्यनिर्मितीच्या पार्श्वभूमीचे अवलोकन केले असता फुले–आंबेडकरांचा परिवर्तनवादी विचार हाच आंबेडकरवादी साहित्याची प्रेरणा ठरलेला आहे असे म्हणता येईल. गावकुसाबाहेरचे जीवन जगणाऱ्या दलित समाजाला डॉ. आंबेडकरांनी 'आत्मभान' दिले. दलितांना 'माणूस' म्हणून जगणे नाकारणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध डॉ. आंबेडकरांनी लढा पुकारला. यामुळेच आंबेडकरी चळवळ आणि त्यांचे तत्त्वज्ञान यापासून प्रेरणा घेऊन आंबेडकरी साहित्य विविध वाङ्मयप्रकारांच्या माध्यमातून अभिव्यक्त होऊ लागले.

अस्पृश्यांच्या अस्मितेला जागृत करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमागे गौतम बुद्ध आणि महात्मा फुले यांचा वैचारिक वारसा होता. त्यामुळे धर्मांतरानंतर अन्याय, छळ, वेदना सोसणाऱ्या या दलित वर्गातून विद्रोहाच्या भावना व्यक्त होऊ लागल्या. या विद्रोहाचे पडसाद साहित्यात उमटणेही स्वाभाविक होते. डॉ. गंगाधर पानतावणे आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्याच्या स्वरूपावि  ायी सांगताना म्हणतात, ''आमचे साहित्य आमचे जीवन आहे. त्यात आमच्या जीवनातील आशा–आकांक्षांचे, लाचारीचे, असाहायतेचे, प्रतिकाराचे, नव्या जगाचे स्वप्न पाहण्याचे, भूतकाळाचा वेध घेण्याचे, भवि  याची चाहूल व्यक्त करण्याचे अनुभवरुप असेल, हे सारे व्यक्त होताना ते व्यक्तिगताच्या पातळीवर उरतच नाही, त्याला सम  टीचे रूप येते.''[१] यामुळेच आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचा विचार करताना सामाजिक बांधिलकीबरोबरच वेदना, विद्रोह, नकार आणि विज्ञाननि  ठा या वैशि  ट्यांचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. आंबेडकरवादी विचारांनी प्रेरित झालेल्या नवशिक्षित कवयित्रींनी पूर्वापार चालत आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक बंधनांना झुगारून मानवमुक्तीच्या विचारांचा स्वीकार केला आहे, याचा प्रत्यय त्यांच्या कवितेतून येतो.

तसे 'मलाही बरेच सांगता येण्यासारखे आहे व ते मी सांगणारच' या जाणिवेतून दलित कवयित्री लिहू लागल्यात. परंतु, दलित स्त्रीचे 'दलितत्त्व' हे दुहेरी स्वरूपाचे आहे. एक तर दलित म्हणून व त्यातही स्त्री म्हणून. स्वत:ला सावरीत युगानुयुगाच्या पीडित, शोषित आणि शापित राहिलेल्या स्त्रीच्या आंतरिक दु:खभोगाचा डोळस आविष्कार आंबेडरवादी स्त्रीच्या काव्यलेखनातून झालेला दिसतो.

> ''धुवून टाका चेहऱ्यावरचा भयग्रस्त अंधार
> प्रकाशाचे दिवे आणलेत मी तुमच्यासाठी
> ... तुमच्यासाठी मी सूर्यादय आणला
> प्रकाशमान व्हा, प्रकाशमान व्हा.''

असा आंबेडकरी सूर्याचा संदेश हिराबाई बनसोडे आपल्या शब्दांमधून उजळत ठेवतात. म्हणूनच त्यांची कविता फुले—आंबेडकर विचार प्रमाण मानणारी अस्मितेची संपन्न जाणीव असलेली प्रगल्भ कविता आहे. त्या लिहितात, ''मी कार्यकर्ती नाही. कुठल्याही चळवळीशी माझा प्रत्यक्ष संबंध नाही. परंतु, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीशी माझे अतूट नाते आहे. या चळवळीने मला घडविले आहे. बाबासाहेबांनी दिलेल्या उजेडाच्या फुलांचे दिवे करून मी प्रगतीचा मार्ग शोधत आहे. प्रवास खूप करायचा आहे याची जाणीव आहे. म्हणूनच आता घाई करायची आहे.''[२] कवयित्री हिरा बनसोडे यांच्याप्रमाणेच अनेक कवयित्रींनी आपल्या मनोगतामध्ये फुले—आंबेडकरांचा विचार प्रेरणास्थानी असल्याचे मत नोंदविले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक दृष्टीमुळे या कवयित्रींमध्ये एक सजगता दिसते. आपण स्त्री आहोत आणि स्त्री असणे हा आपला सन्मान आहे, याचे नवे आकलन त्यांच्या कवितेत जाणवते. कारण विसाव्या  ातकातील डॉ. आंबेडकरांनी उभारलेला उत्क्रांतीचा लढा हा आंबेडकरवादी साहित्य चळवळीतील लेखक, कवींना सतत प्रेरणादायी ठरला आहे. कवयित्री संध्या रंगारी त्यांच्या 'आघात' या पहिल्याच काव्यसंग्रहात आपली निर्मितीप्रेरणा स्प  टपणे अधोरेखित करतात. त्या म्हणतात, ''क्रांतिवीर जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन ज्ञानाचे पंख फुटले आणि नवचैतन्य घेऊन दु:खित शोषितांच्या विश्वात भराऱ्या मारू लागले. त्याच्या दु:खांना कुरवाळू लागले. अश्रूंनी न्हाऊ लागले आणि पाहता—पाहता माझ्या अश्रूंनी पेट घेतला.''[३] आपण केवळ स्त्री असल्यामुळे स्त्रीत्वाची वेदना आपल्या वाट्याला आली, त्यात आपला दोष नसून समाजाचा पारंपरिक दृष्टिकोन याला कारणीभूत आहे, हे सत्य त्यांना उमगले आहे. म्हणूनच समकालीन आणि बदलणाऱ्या समाजवास्तवाचे चित्रण त्यांच्या कवितेत पाहायला मिळते, ही या कवितेतील एक जमेची बाजू आहे. या चित्रणामुळे या कवितेचा परीघ विस्तारला आहे. अशाच प्रकारचा आशय कवयित्री प्रज्ञा पवार आपली प्रेरणा स्पष्ट करताना लिहितात, ''मला समजलेल्या फुले—आंबेडकरवादाच्या सम्यक भानाने लिहीत राहीन.''[४] म्हणूनच स्त्रीविषयक जाणिवा हा अत्यंत सहज आणि स्वाभाविक आविष्कार या कवितेत दृष्टीस पडतो. जात, धर्म, भाषा, प्रदेश यांच्या पलीकडे असलेल्या भावविश्वाची नोंद या कवयित्री करताना दिसून येतात.

फुले—आंबेडकरी विचारांच्या आधारे या कवयित्री भोवतालच्या परिस्थितीचा अन्वयार्थ लावतात. किंबहुना या विचारांशिवाय आपल्याला पर्याय नाही, अशी भूमिका या कवयित्री घेताना दिसतात. ''एक व्यक्ती म्हणून स्वत:ची ओळख पटावी आणि खऱ्या अर्थाने मानसिक विकास व्हावा यासाठी फुले—आंबेडकरांच्या साहित्याचं मर्म जाणून घेण्याशिवाय पर्याय नाही, हे मला उमगलं''[५] स्वत:ला समजलेल्या विचारांचा प्रसार करण्याच्या प्रामाणिक हेतूने सुरेखा भगत लेखन करताना दिसून येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आणि चळवळीचे प्रतिबिंब या कवियित्रींच्या कवितेमध्ये दिसून येते. आदिवासी समाजातील कवयित्री उषाकिरण आत्राम यादेखील आपली प्रेरणा व्यक्त करताना म्हणतात, ''फुले—आंबेडकर साहित्याशी स्वत:चं नातं, त्या बंधुत्वाशी नाळाचं नातं जुळवून माझी लेखणी मी चालवीत असते. माझा दु:खी, कष्टी समाज आजही वेदनेत कण्हत आहे. मात्र अश्रू गाळणे आम्हाला माहीत नाही. ढोल मांदरीच्या सुरांत, रेल्यांच्या स्वरांत आमची दु:खे पळून जातात.''[६] येथे कवयित्रीच्या विचारांची स्पष्टता दिसून येते. सर्वच पातळ्यांवर मागास राहिलेला आदिवासी समाज 'माणूस' म्हणूनही नाकारला जातो. स्वत:च्या आदिवासी समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी कवयित्री लेखणीची तलवार हाती घेताना म्हणतात, ''त्या झगमगत्या जगात माझ्यासारख्या आदिवासी कवयित्रीच्या कवयित्रीचं रूपडं सौंदर्यवान

नसेल, पण जरूर ताकदवान आणि वास्तववादी आहे. हा नकली गलबला करणारा नाटकी चेहरा नाही. तर अस्सल साग आणि अस्सल नाग आहे. बाबासाहेबांचं विचारधन वाटणारी ही सावित्रीची लेक वेदनेच्या हाका वाटीत एकीसाठी संघटित होण्यासाठी आपला दिवा आपण घेऊन प्रकाशमान, गतिमान, बुद्धिमान, विचारवंत होण्यासाठी हाक देणारी लेखणीची तलवार आहे.''७ यावरून कवयित्री बाबासाहेबांचे विचारधन हेच आपल्या काव्यनिर्मितीचे प्रेरणास्थान असल्याचे नमूद करतात. कोणताही दुर्लक्षिलेला समाजघटक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीचा विचार आणि चळवळीने संघर्षास उभा राहतो. याचेच प्रत्यंतर या आदिवासी कवयित्रीच्या निमित्ताने आल्यावाचून राहत नाही.

समस्त स्त्रियांना परंपरेच्या चिरेबंदी वाड्यातून मुक्त करून मोकळा श्वास घेता यावा याकरिता फुले–आंबेडकरांचा क्रांतिकारी विचारच दिशादर्शक ठरणार आहे, याचे भान कवयित्रींना आहे. ''बोधी संस्कृतीचा वारसा असलेल्या या भारतभूमीचा इतिहास मनुवादाने पार कलंकित करून टाकला. या मधल्याच संस्कृतीची काळीकुट्ट पडछाया अजूनही भारतीय समाजाला घट्ट बिलगून आहे. ती नाहीशी करण्यासाठी बोधी संस्कृतीचा खरा इतिहास शोधून काढणे आणि लिहिणे गरजेचे आहे. फुले–आंबेडकरांच्या पावलावर पावले टाकीत नव्या पिढीने हे काम जबाबदारीने करायला हवं.''८ हाच विचार कवयित्री शांताबाई पवार आपल्या मनोगतात मांडताना म्हणतात, ''आज जे आम्ही येवढे सुखासमाधानाने जगत आहोत ही सारी बाबासाहेबांचीच कमाई आहे. त्यांच्यामुळेच आज आम्ही माणसासारखे जगू लागलो, वागू लागलो, बोलू व लिहू लागलो.''९ अशा वेळी आंबेडकरवादी कवयित्रींच्या समग्र कवितेतून फुले–आंबेडकरी जाणिवांचे सलग चित्रण उभे होताना दिसून येते. आपापल्यापरीने प्रत्येक कवयित्रीने कवितांच्या माध्यमातून या विचारांविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहेच. याशिवाय मनोगतातूनही आपल्या भावना शब्दबद्ध केल्या आहेत.

आजपर्यंतच्या आंबेडकरवादी काव्यप्रवासात अनेक कवयित्रींनी कविता समृद्ध केली आहे. बहिष्कृत समाजातील स्त्रीमनांनी केलेली संस्कृतीची समीक्षा, वर्तमानकाळातील भोगवट्याचा आलेख आणि मूलगामी परिवर्तनासाठी घेतलेला आंबेडकर क्रांतीचा वसा असे या कवयित्रींच्या काव्याचे स्वरूप आहे. सरिता जांभुळे, संध्या रंगारी, मीना गजभिये, उषा भालेराव, धम्मज्योती कांबळे, आशा थोरात, उषा साळवे अशा अनेक कवयित्रींचा उल्लेख करता येईल. या कवयित्रींची प्रकृती वेगवेगळी आहे. वेगवेगळ्या भावविश्वात त्या विहार करतात पण त्यांच्या अंतर्यामी आंबेडकर जीवनसूत्रे तेवत आहेत. हे मात्र जाणवत राहते. पहिल्या पिढीतील आंबेडकरवादी कवयित्रींमध्ये हिरा बनसोडे यांची कविता महत्त्वाची आहे. त्यांच्यानंतर ज्योती लांजेवार यांची कविता अग्रेसर आहे. त्यानंतर प्रज्ञा पवार, प्रतिभा राजानंद, कुंदा गायकवाड, गिपल गिमेकर, सरला ठमके, कुमुद पावडे, उषाकिरण आत्राम, संध्या रंगारी, उषा हिंगोणेकर, ज्योत्स्ना चांदगुडे, माया वासनिक, सुरेखा भगत यांची कविता एकूणच आंबेडकरवादी कवितेत महत्त्वाची आहे.

एकंदरीत आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यप्रेरणांमध्ये फुले–आंबेडकरी विचार आणि चळवळीची पार्श्वभूमी हा घटक समान आढळतो. व्यक्तिपरत्वे लेखनाच्या प्रेरणा निरनिराळ्या असल्या तरीदेखील परिवर्तनवादी विचार हे त्यामागील महत्त्वाचे सूत्र आहे. याशिवाय फुले–आंबेडकरवादी चळवळीतील प्रत्यक्ष सहभाग किंवा चळवळीतील कार्यकर्त्यांचा सहवास आणि मार्गदर्शन, 'अस्मितादर्श' या नियतकालिकाचे साहित्यिक मेळावे, दलित साहित्यप्रवाहातील लेखक–कवींचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन, कुटुंबीय आणि नातेवाईकांचा पाठिंबा इत्यादी अनेकविध घटकांमुळे आंबेडकरवादी कवयित्री लेखन करताना दिसतात.

**संदर्भ**

१. साहित्य : शोध आणि संवाद, डॉ. मनोहर जाधव (संपा.), सुविद्या प्रकाशन, पुणे, २०००, पृ. २७.
२. फिर्याद, हिरा बनसोडे, समाज प्रबोधन संस्था, पुणे, मार्च १९८४, मनोगत.
३. आघात, संध्या रंगारी, शब्ददान प्रकाशन, नांदेड, डिसेंबर, १९९२, पृ. २०.
४. केंद्र आणि परीघ, प्रज्ञा पवार, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, सप्टेंबर २००४, पृ. ५१.
५. साक्ष, सुरेखा भगत, प्रशांत प्रकाशन, बुलढाणा, सप्टेंबर १९९४, पृ. २.
६. म्होरकी, उषाकिरण आत्राम, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर, २२ फेब्रुवारी १९९७, पृ. ८.
७. लेखणीच्या तलवारी, उ ाकिरण आत्राम, प्रकाशक– उ ाकिरण आत्राम, गोंडपिपरी, चंद्रपूर, १४ नोव्हेंबर २००९, पृ. ५.
८. यशोधरेची लेक, आशालता कांबळे, फिनिक्स प्रकाशन, कणकवली, सिंधुदुर्ग, ऑक्टोबर २००५.
९. पॉवर हाऊस, ाांताबाई पवार, समाजप्रबोधन संस्था, नाशिक, जानेवारी २०१०, पृ. ६.